प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त नागरीकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी सिडकोतर्फे आयोजित करण्यात आली प्रभातफेरी**

केंद्रीय दक्षता आयोगातर्फे भ्रष्टाचारविरोधी जनजागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने सिडको महामंडळामध्ये देखील दि. २७ ऑक्टोबर २०२५ ते ०२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या निमित्ताने आज दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ रोजी दक्षता जनजागृती सप्ताहाविषयी नागरीकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी सिडकोतर्फे प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले.

या प्रभातफेरीत डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, तसेच श्री. सुरेश मेंगडे, पोलीस उपमहानिरीक्षक तथा मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांच्यासह सिडकोचे विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी यांनी देखील मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

सदर प्रभातफेरी सिडको भवन ते बेलापूर, सेक्टर ११ पर्यंत आयोजित करण्यात आली होती. या प्रभातफेरीप्रसंगी अधिकारी व कर्मचारी यांनी विविध फलक व घोषणा यांच्या माध्यमातून नागरिकांना “दक्षता : आमची सामायिक जबाबदारी” या उक्तीचा आपल्या दैनंदिन जीवनात देखील अवलंब करण्याचे आवाहन केले.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -